I J R S S I S, Spl Issue (III), July-2020 : 320-322
A Double-Blind Peer Reviewed Journal
e-ISSN 2347 – 8268 & 2347-8209 (P)
Original Article

INTERNATIONAL JOURNAL OF RESEARCHES IN SOCIAL SCIENCE AND INFORMATION STUDIES

© VMS RESEARCH FOUNDATION www.ijrssis.in

# कोरोनाचा आर्थिक शैक्षणिक क्षेत्रावर होणारा परिणाम

M. A. Gudadhe
Chintamani Mahavidyalaya Pombhurna, Dist. Chandrapur.
*Corresponding Author: manojgudadhe5@gmail.com

**ABSTRACT:**

**Key words: -**

**प्रस्तावणा:-**

कोरोनाच्या विषाणूमुळे जगभरात आतापर्यंत 558000 इतके लोक मृत्यू पावलेले आहेत. या कोरोनाच्या संसर्गामूळे जगातील बलशाली सत्ता सूध्दा हतबल झालेली आहे. कोरोनाच्या वाढत्या प्रसारामूळे मानवाला जीवंत राहाने हिच आपली प्राथमिकता आहे. या साथीचा प्रसार श्रीमंतापासून तर गरीबांपर्यत सातत्याने होत आहे. यावर अजूनही शास्त्रज्ञांना नियंत्रक लस बनविण्यात यष आलेले नाही. कोरोनाचा प्रार्दूभाव रोकण्यासाठी कर्तव्यदक्ष लोक सातत्याने अहोरात्र आपल्या जीवाची बाजी लावून सेवा देत आहेत. तरीही काही लोक कोरोनाला प्रतिकार म्हणून पालन करीत नाहीत. लोकांनी सामाजिक कृतज्ञता व्यक्त करण्यासाठी सामाजिक शिस्तपालन करणे आवश्यक आहे. ला ॅकडाउनच्या काळात लोक कामाशिवाय बाहेर पडू नये किंवा अत्यंत निकडीच्या कामानिमित्य बाहेर पडतांना आवश्यक ती काळजी घ्यावयास पाहिजे. ब-याच लोकांनी सामाजिक अंतराचे भान न ठेवता कोरोनाच्या संसर्गाचा धोका पत्करून किराना दुकानामध्ये, भाजीमंडी मध्ये गर्दी केलेली आहे. कफर्यूचे उल्लंघन केल्यामूळे कितीतरी वेळा पोलिसांना लाटीमार करावा लागला आहे.

सद्या भारतीय अर्थव्यवस्थेची परिस्थिती बीकट आहे आणि अनेक समस्यांना जन्म घालत आहे. मजूर वर्गाचे बेहाल झालेले आहेत उत्पादन कार्य बंद पडल्यामळे मजूर वर्गाला हाताला काम नाही. परत गावाकडे परतल्यामूळे ग्रामीण भागात कामच उपलब्ध नाहीत त्यामूळे मजूर वर्गावर उपासमारीची पाळी आली आहे. त्यामूळे सरकारने मंदिर बांधने पुतळा उभारणे यापेक्षा सर्वांना अन्न ,निवारा, शिक्षण, अशा प्राथमिक मुलभूत गरजा पूर्ण करण्यासाठी लक्ष पूरविले पाहिजे. बॅकांनी दिलेले कर्जे े परत न आल्यास बॅकेचे दिवाळे निघेल त्यामूळे बॅक व्यवसाय धोक्यात येउ शकते तसेच विदेशी बाजारात रूपयाची सतत घसरण होत आहे, जी.डी.पी.मध्ये घसरण होत आहे. त्यामूळे अर्थव्यवस्था दारिद्रयाच्या दृष्टचक्रात सापडली आहे. लोकांना रोजगार नाही उद्योगांचे उत्पादन ठप्प आहे

पर्यटन व्यवसाय ,सेवा उद्योग या सर्व बांबींचा नव्याने पूर्नस्थापन करणे गरजेचे आहे.

**शिक्षण क्षेत्र:-** कोरोनाला रोकण्यासाठी अनेक देशांनी शिक्षण संस्था सुध्दा बंद केलेल्या आहेत. युनेस्कोच्या अहवालानूसार एप्रील 2020 मध्ये 188 देषंात 154 कोटी विद्यार्थी घरी बसलेले आहेत तसेचे 26 कोटी विद्यार्थी 89 लाख शिक्षक घरी बसलेले आहेत. उच्च शिक्षणात 50 हजार शिक्षण संस्था बंद आहेत 3.70 कोटी विद्यार्थी आणि 15 लाख महाविद्यालयीन शिक्षक घरी बसलेले आहेत. 30 कोटी विद्यार्थी रिकामेपने घरी बसने हा एक टाईम बाॅम आहे. सद्या केवळ कोरोनाची समस्या ही केवळ आरोग्याची समस्या आहे. असे मानले जाते. पण या संकटाला शैक्षणिक समस्यांची बाजू आहे हे लक्षात घेने आवश्यक आहे. लोकांचे रिकामेपण एकटेपणा घालवण्यासाठी दूरदर्शन वरती रामायण, महाभारत या मालिका दाखवून वर्तमान समस्यांवर मात करता येनार नाही. यूनेस्कोने शाळा बाहय झालेल्या विद्याथ्र्यांवर तातडीने उपाय करण्यासाठी दूरशिक्षण , माहिती तंत्रज्ञानाचा वापर यासाठी यूटयूब, मल्टीमिडीया, मोबाईल फोन , ई.लायब्ररी दूरदर्शन इत्यादी उपकरणांचा वापर करून देशातील शिक्षण प्रवाह खंडीत होणार नाही. यासाठी सरकारने कसोसीने प्रयत्न करणे गरजेचे आहे. सद्या आपल्या भारत देशात या विषयी परिक्षा रद्द करण्ेा, पूढे ढकलने , पूढच्या वर्गात प्रवेश देणे इत्यांदी निर्णय घेण्यात आले आहेत. उच्च शिक्षणात मेडीसीन, इंजीनिअरींग ,कामर्स, मॅनेजमेंट या व्यवसायीक उच्च शिक्षणात तंत्रज्ञानाचा वापर मोठया प्रमाणावर केला जातो. या शिक्षणात प्रवेशित विद्याथ्र्याची आर्थिक स्थिती सक्षम असते. त्यामूळे लॅपटाॅप, इंटरनेटचा खर्च ते सहज करू शकतात. उच्च मध्यम वर्गातील लोकही हा खर्च सहज करू शकतात. त्यांच्या मुलांचे शिक्षण आजही सातत्याने सुरू आहे. आज समस्या आहे ती म्हणजे देशातील काटकसरी गरीब वर्गातील लोक, भटके भूटके आदिवासी आणि सरकारी शाळेत जाणारे विद्यार्थी . आपल्या देशामध्ये माहिती तंत्रज्ञानामूळे शिक्षणाचा प्रचार, विस्तार, शिक्षणाचा दर्जा या बाबतीत शिक्षण विषयक विस्ताराची फार मोठी संधी आहे. ट्राय च्या अहवालानुसार भारतात 2020 मध्ये इंटरनेेट वापरणा-यांची संख्या 68.45 कोटी आहे. मोबाईन फोन वापरणा-यांची संख्या 48.82 कोठी आहे. स्मार्टफोन वापरणा-यांची संख्या 40.72 कोटी आहे. टी.व्ही. पाहाणा-यांची संख्या 76 कोठी आहे. भारतात एवढा तंत्रज्ञानाचा विस्तार झाला असतांनाही त्यात प्रचंड विषमता आहे. भारतात 42 टक्के जनता इंटरनेटचा वापर करते. म्हणजेच निम्न भारत अजूनही इंटरनेटच्या वापरापासून वंचीत आहे. ग्रामीण भागात 36 टक्के जनता तर षहरात 64 टक्के जनता इंटरनेटचा

वापर करते. तसेच 67 टक्के पुरूष तर 38 टक्के स्त्रिया इंटरनेटचा वापर करतात. त्यामूळे व सधन वर्गाचाच या क्षेत्रात मक्तेदारी आहे. म्हणून अप्रगत देशामध्ये टी.व्ही. माध्यमांचा वापर शाळा बंद च्या काळात करावयास सुरूवात केली आहे. आपल्या देशात मात्र तशी चर्चा नाही आहे. भारतात 900 हून अधिक चा◌ॅनेल आहेत त्यामूळे घर बसल्या विद्याथ्र्यांना या चा◌ॅनलच्या माध्यमातून कसा लाभ घेता येईल या विषयी विचार करणे गरजेचे आहे. याबाबत शिक्षण विभागाने काळजी घेतलेली नाही. परदेशात शिक्षणासाठी गेलेले विद्यार्थी आणि त्यांचे पालक यांच्या समोर अडचणिचे डोंगर उभे आहे. यासाठी काही विद्यापिठे आधूणिक तंत्रज्ञान , कृत्रिम बुध्दीमत्ता रोबोटिक यांचा वापर करण्याच प्रयत्न करीत आहेत. एकून 750000 भारतीय विद्यार्थी परदेशी शिक्षणाच्या अडचणीत सापडले आहेत. त्यासाठी मत्रालय उपाय योजना तयार करीत आहे.

**शेअर्स बाजार:-** कोरोनाचा फटका श्ेअर्र बाजारावर सुध्दा झाला आहे. दिवसेंदिवस शेअर्स बाजार कोसाळत आहे. मुंबई शेअर्स बाजार 1700 पेक्षा जास्त अंकानी खाली आला आहे. राष्ट्रीय शेअर्स बाजाराच्या निप्टीमध्ये सुध्दा 500 अंकानी घसरण आली आहे. अमेरीकन अध्यक्ष डोलाल्ड ट्रम यांनी बाहेरीत लोकांना अमेरीकेत प्रवेश करण्यास बंदी केलेली आहे. त्याचा परिणाम शेअर्स बाजारावर आहे. चिन मधून होणारे आयातीचे मूल्य 87 हजार अमेरीकन डालर्स एवढे असून 2002.2003 च्या आयातीच्या 18 पट आहे.

**शेती क्षेत्र:-** शेती सर्वेक्षणात 29 टक्के शेतक-यांनी कोरोनामूळे शेतीच्या कामात विस्कळीत पण आला असे स्पष्ट केलेत. तर 43 टक्के शेतक-यांनी शेतमाल बाजारपेठेत पोहोचविण्यासाठी अडथडे आल्याचे स्पष्ट केले. 5 टक्के शेतक-यांनी कोरोनामूळे शेतीवर वाईट परिस्थिती आल्याचे सांगितले. त्यामध्ये सरकार कडून धान्य खरेदीत निर्माण झालेला अडथडा, शेतातून बाजारात माल आणन्याचा अडथडा, कामगाराची कमतरता, वाहानाची कमतरता, कृषि उत्पंन्न बाजार समितीतील अडथडे इत्यादी समस्यांचा शेतक-यांना सामना करावा लागत आहे.

**संदर्भ:-**

कोरोना सामाजिक आर्थिक परिस्थिती - प्रा.रातरत्न कोसंबी.

कोरोनाचे आर्थिक परिणाम गोमंन्तक -डा◌ॅ. मनोज कामंत

कोरोनाग्रस्त अर्थव्यवस्था अग्रलेख - भारत अ◌ॅाग्री मराठी न्यूज अॅप.

The foundation of agrian studies -prof- R.Ramkumar